निर्धार समानतेचा

**Addressing Gender-based Violence and Discrimination, particularly Domestic Violence and Child Marriage in the Marathwada region of the State of Maharashtra, India.**

Project by ILS Law College in Partnership with SWISSAID, Co-Funded by European Union

# कथा लेखन स्पर्धा

कथा लेखन स्पर्धा

भारतामध्ये आजही लाखो मुलामुलींसाठी बालविवाह हे एक विदारक  सत्य आहे, जे त्यांना त्यांच्या शिक्षण, आरोग्य आणि बालपणापासून वंचित ठेवते. प्रत्येक आकडेवारीमागे एक व्यक्त होऊ पाहणारी कथा असते — संघर्षाची, मौनाची, धैर्याची किंवा आशेची!

ही कथा लेखन स्पर्धा, तरुण विद्यार्थ्यांना बालविवाह या सामाजिक मुद्द्यावर त्यांच्या लेखणीच्या माध्यमातून प्रकाश टाकण्याची संधी देत आहे.  ज्यांनी हे वास्तव अनुभवले आहे, त्यांच्या भावविश्वात सहभागी होऊन या समस्येचा त्यांच्या  मनावर झालेला खोल परिणाम, त्यांच्यावर असणारा सामाजिक दबाव आणि त्यांच्यामध्ये झालेल्या परिवर्तनाचा प्रवास समजून घेण्याची ही एक संधी आहे.

मौन सोडून आपल्या शब्दांच्या माध्यमातून अशा जगाची कल्पना साकार करण्याचा प्रयत्न करूयात जिथे प्रत्येक मुलाचा मुक्तपणे स्वतःचा विकास करण्याचा, शिकण्याचा, आणि सक्षम होण्याचा हक्क अबाधित राहील.

आजपर्यंत अनेक न सांगितलेल्या कथांना आवाज देण्याचे काम तुमची कथा करू शकते.

## स्पर्धेचे नियम

**1. विषय:**
बालविवाहाचा अंत : प्रत्येक बालकाचा आवाज

**2.** पात्रता**:**

● “निर्धार समानतेचा” या प्रकल्पात सहभागी असलेल्या महाविद्यालयांतील (आय् एल् एस् विधी महाविद्यालय,पुणे सहित) विधी शाखेतील पाच वर्षांचा (BA.LL.B / BSL.LL.B) किंवा तीन वर्षांचा (LL.B) अभ्यासक्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीच ही स्पर्धा खुली आहे.

● प्रत्येक प्रवेशिकेत फक्त एकाच विद्यार्थ्याचा समावेश करता येईल. एका प्रवेशिकेत एका पेक्षा जास्त विद्यार्थ्यांचा समावेश करता येणार आहे.

● प्रत्येक विद्यार्थ्याला फक्त एकच कथा सादर करता येईल.

**3.** भाषा**:**

● कथा मराठीत असावी आणि ती पूर्णतः तुम्ही लिहिलेली मूळ कथा असावी आणि पूर्वप्रकाशित झालेली नसावी.

● भावना दुखावणारी आणि अश्लील भाषा वापरणे टाळावे. अशा भाषेचा वापर झाल्यास ती कथा ग्राह्य धरली जाणार नाही.

**4.** शब्दमर्यादा**:**

● कथा **1000** ते **1500** शब्दांदरम्यान असावी.

**5.** सादर करण्याची पद्धत**:**

● कथा **.doc, .docx** किंवा **PDF** फॉरमॅटमध्ये ई-मेलद्वारे खाली नमूद केलेल्या ईमेलवर पाठवावी: **violencenomore@ilslaw.in**

**6.** कथेसाठी सुरुवातीची वाक्ये **(**खालीलपैकी कोणतेही एक निवडावे**):**

a. *“मी फक्त तेरा वर्षांची होते, जेव्हा त्यांनी सांगितलं की आता मला शाळेत जायचं नाही, माझं लग्न ठरवणार आहेत.”*

b. *“तिने माझा हात घट्ट पकडला आणि माझ्या कानात कुजबुजली, 'हे ते जीवन नाही, जे मी तुझ्यासाठी स्वप्नात पाहिलं होतं.'”*

c. *“नेहमीसारखंच उजाडलं होत, पण त्या दिवशी काहीतरी वेगळंच वाटत होत. (काहीच सामान्य वाटत नव्हतं.)”*

सदर वाक्यांपैकी एक निवडून त्यावर आधारित भावनिक**,** सामाजिक आणि कायदेशीर परिणामांवर भाष्य करणारी स्वतंत्र कथा तयार करावी**.**

**7.** शेवटची तारीख**:**

● सर्व कथा ५ ऑगस्ट २०२५**,** रात्री ११.५९ वाजता पर्यंत सादर कराव्यात.

**8.** मूल्यांकन निकष**:**

| अनु क्र. | तपशील | गुण |
|---|---|---|
| **1** | विषयाशी सुसंगती | **15** |

| | | |
|---|---|---|
| **2** | स्वनिर्मिती आणि सृजनशीलता | **15** |
| **3** | भाषा आणि अभिव्यक्ती | **10** |
| **4** | रचना आणि सुसूत्रता | **10** |
| **5** | एकूण | **50** |

**9.** इतर बाबी**:**
- स्पर्धकांनी पाठवलेल्या कथेचा वापर प्रचार, प्रसिद्धी किंवा कायदेशीर जनजागृती करिता वापरण्याचा अधिकार , आयोजकांना असेल.
- स्पर्धेत सादर केलेल्या कथा सर्वांसाठी खुल्या / उपलब्ध असतील. स्पर्धकांना त्यावर कोणताही कॉपीराइटचा अधिकार दाखवता येणार नाही.
- आयोजक या कथा छापील किंवा डिजिटल माध्यमांतून वापरू शकतात.
- कथा पूर्णपणे स्वतः लिहिलेली असावी. साहित्याची चोरी/ नक्कल आढळल्यास स्पर्धेतून बाद केले जाईल.

**10.** बक्षिसे**:**
- सर्वोत्कृष्ट तीन कथांना प्रमाणपत्र, ट्रॉफी आणि आयोजकांद्वारे ठरवण्यात आलेले उचित बक्षीस दिले जाईल.
- सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सहभागी झाल्याचे प्रमाणपत्र दिले जाईल.

स्पर्धेविषयी शंका असल्यास संपर्क साधा**:**
दीपाली चव्हाण (प्रकल्प व्यवस्थापक): +91 9657638406, +91 7757995838

ईमेल**:** violencenomore@ilslaw.in